❖ **<u>सेप्टीक टँक (SEPTIC TANK) :-</u>**

सेप्टीक टँक असलेल्या शौचालयामध्ये निर्वातीय (ANAEROBIC) स्थितीमुळे, एका विशिष्ट प्रकारच्या जीवाणूच्या प्रक्रियेने मैल्याचे पाणी गाळात रुपांतर होत असते. सदरहू गाळ काही काळानंतर पुष्कळ प्रमाणात जमा होवून, मैल्यावरील प्रक्रीया मंदावते व आऊटलेट पाईपमधून ओव्हरफ्लो होवू शकते. अशी परिस्थिती उदभवू नये म्हणून, सेप्टीक टँकमधील गाळाचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या गाळाचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने, ग्रामपंचायतीच्या शाश्वत स्वच्छता आराखड्यातील नमूद सेप्टीक टँक असलेल्या शौचालयांची यादी व त्यांचा अंतिम उपसा दिनांक याबाबतची माहिती, ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन द्यावी. सर्वसाधारणपणे सेप्टीक टँक उपसा करणा-या संस्थाची यादी, नगरपालिका/ महानगरपालिका इत्यादींकडे उपलब्ध असते. संबधित ग्रामपंचायतींनी त्यांना नजिकच्या असलेल्या नगरपालिका/महानगरपालिका इत्यादींकडून संस्थांची माहिती घेवून, त्यांच्यापैकी किमान दर असणा-या संस्थेकडून सेप्टीक टँक उपसा करण्याची कार्यवाही करावी.

- सिंगल पिट, ट्विन पिट तसेच सेप्टीक टँक अशा प्रकारच्या शौचालयाची शाश्वत स्वच्छता आराखडयामध्ये उल्लेख असणे आवश्यक आहे.
- सिंगल पिट, तसेच सेप्टीक टँक मधील मैला, विनिर्दिष्ठ मल विघटन प्रक्रिया केंद्रावर (STP- SEWAGE TREATMENT PLANT ) विघटन प्रक्रिया करण्याकरिता निर्दिष्ठ ठिकाणी भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनाद्वारे, वाहून नेण्याची व संबधित संस्थेस भाडे देण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायतींची राहील. मल विघटन प्रक्रिया केंद्राच्या (STP- SEWAGE TREATMENT PLANT ) व अशा सर्व वाहन संस्थाच्या नोंदी संबधित जिल्हा परिषदेने घेण्यात याव्यात व यासंदर्भातील अद्ययावत यादी सर्व ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावी. गट विकास अधिका-यांनी त्यांच्या गटातील ग्रामपंचायतींचा गट करून, सर्व संबधित ग्रामपंचायती यांच्याशी समन्वय साधून, अशा ग्रामपंचायतींना वाहन देण्याची सेवा, उपलब्ध करून देवून, संबधित ग्रामपंचायतींकडून अशा प्रकारची कार्यवाही होईल, अशा प्रकारचे सनियंत्रण करावे.
- सेप्टीक टँक भरून वाहणार ( OVER FLOW) नाहीत, याकरिता ग्रामपंचायतीने योग्य ती जनजागृती करावी.
- नादुरूस्त/अतांत्रिकदृष्ट्या बांधण्यात आलेल्या सेप्टीक टँकची दुरूस्तीकरण करणे आवश्यक राहील.
- गावामध्ये तयार होणा-या सोनखताबाबत संबधित ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांनी जनजागृती करावी.

**मैला मिश्रित सांडपाण्यावरील प्रक्रिया ( BLACK WATER TREATMENT) :-**

- सेप्टीक टँक मधून बाहेर पडणा-या मैला मिश्रित सांडपाण्याचा ( BLACK WATER ) कोणत्याही परिस्थितीत जमिनीवर इतरत्र पसरणार नाही, सांडपाण्याच्या नालीमध्ये जाणार नाही वा पाण्याच्या अस्तित्वातील स्त्रोतामध्ये मिसळणार नाही, याची दक्षता ग्रामपंचायतीने घ्यावी. सेप्टीक टँक मधून बाहेर पडणारे मैला मिश्रित सांडपाणी (BLACK WATER) जिरविण्याकरिता शोष खड्ड्याचा वापर करण्यात यावा व याबाबत संबधित ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांनी जनजागृती करावी.

**विवरणपत्र क**

**अंदाज पत्रक आराखड्यामध्ये समावेश करावयाच्या उपाययोजना**

| घनकचरा व्यवस्थापन | सांडपाणी व्यवस्थापन |
|---|---|
| **कुटुंब (वैयक्तिक) स्तरावर** | **कुटुंब (वैयक्तिक) स्तरावर** |
| **अ) पाळीव प्राण्यासाठी खाद्य, ओला कचरा ताजा असल्यास गुरांसाठी खाद्य म्हणून वापरणे.**<br>**ब) खतखड्डा घरगुती = एकूण संख्या**<br>**क) बांधीव खतखड्डा = एकूण संख्या**<br>**ड) नाडेप खतटाकी (लहान) = एकूण संख्या (चार कप्पे)** | **अ) परसबाग पाईपड् रुट झोन व गाळकुंडीसह = एकूण संख्या**<br>**ब) परसबाग साधी गाळकुंडीसह= एकूण संख्या**<br>**क) घरगुती पाझरखडा= एकूण संख्या**<br>**ड) घरगुती शोषखड्डा = एकूण संख्या** |
| **सार्वजनिक स्तरावर** | **सार्वजनिक स्तरावर** |
| **अ) कचरा एकत्रिकरण व्यवस्था दररोज**<br>१) प्रत्येक घरातून २) दुकाने<br>३) कार्यालये/संस्था ४) बाजार/मार्केट<br>**ब) रस्ते/सार्वजनिक स्थळे/सार्वजनिक परिसर येथील झाडलोट व्यवस्था दररोज**<br>**क) कचरा वाहतूक दररोज**<br>(वरील अ/ब साठी अनुदान अनुज्ञेय नाही)<br>**ड) कचऱ्यावर अंतिम प्रक्रिया व्यवस्था**<br>१) निर्धारित कचरा प्रक्रिया स्थळ<br>२) खतखड्डा<br>३) बांधिव खड्डा<br>४) नाडेप खत टाकी (लहान)<br>५) नाडेप खत टाकी (मोठी) (चार कप्पे)<br>६) गांडुळ खत टाकी (मोठी ) चार कप्पे) | **अ) अन्यत्र सांडपाणी व्यवस्थापन.**<br>सांडपाणी गावाबाहेर नेऊन नदी/नाले/तलाव/ इत्यादीमध्ये सोडण्यापूर्वी त्यांच्या आधी बांध घालून त्या आधारे अंतिम प्रक्रिया करुन त्याचा पुर्नवापर करुन सोडणे (एकूण संख्या)<br>**ब) जागेवर सांडपाणी व्यवस्थापन**<br>१) वृक्षारोपण (एकूण संख्या)<br>२) सार्वजनिक पाझरखड्डा (एकूण संख्या)<br>**क) सांडपाणी स्थिरीकरण तळे (लोकसंख्यानुरुप) विकेंद्रित (एकूण संख्या)**<br>**ड) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत दिनांक ३१ डिसेंबर २०१८ च्या मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद ६.१०.४ नुसार तंत्रज्ञाने** |

## विवरणपत्र ड

**कमी वापर, पुर्नवापर, पुर्नचक्रिकरण व पुर्नप्राप्ती (Reduce ,Reuse, Recycle & Recover या अनुषंगाने संक्षिप्त टिप्पणी (Concept Note)**

सांडपाणी व घनकचऱ्याचे संकलन, परिवहन आणि सुरक्षित व योग्य विल्हेवाट म्हणजेच सांडपाणी व घनकच-याचे व्यवस्थापन होय. मानवी जीवनामध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या सांडपाणी व घनकचऱ्याचा आरोग्य व पर्यावरणावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून शास्त्रशुद्ध योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. या करिता कचरा व सांडपाणी याकडे एक साधन संपत्ती यादृष्टीने पाहणे आवश्यक आहे.

**कमी वापर ( Reduce )**

Reduce/Minimisation म्हणजेच दैनंदिन वस्तूंचा कमीत कमी वापर करणे. उदा. प्लास्टिक. प्लास्टिक हि अविघटनशील वस्तू आहे. प्लास्टिकच्या वापराची सध्याची व्याप्ती लक्षात घेता, त्याचे पुर्ननविनीकरण करण्याचे, उपलब्ध असलेले तांत्रिक व आर्थिक पर्याय, किफायतशीर नाहीत. अशा वस्तूंचा किमान वापर करणे, त्यापासून निर्मित घनकचऱ्याचे प्रमाण कमी करणे व अशा वस्तू वापराबाबत, ग्रामस्थांच्या वर्तणूकीमध्ये बदल करणे गरजेचे आहे. याअनुषंगाने प्लास्टिक वस्तु खरेदी करताना पुढील बाबींचे पालन करावे:-

- वस्तू विकत घेण्यापूर्वी, वस्तुची निकड (अत्यावश्यक आहे किंवा कसे ) व सदर वस्तूस असणा-या उपलब्ध पर्यायांचा विचार करणे.
- घराबाहेर जाताना कापडी पिशवी सोबत ठेवावी.
- शक्यतो टिकावू, दुरूस्तीयोग्य व पुन्हा पुन्हा वापरण्यायोग्य वस्तू खरेदी कराव्यात.
- Use and Throw व एकदाच वापरता येणाऱ्या (थर्मोकॉलच्या प्लेट, कप, बॅट्री इ.) वस्तू, विकत घेण्याचे टाळावे.

**पुर्नवापर ( Reuse )**

पुर्नवापर होण्यासारख्या वस्तूंचा वापर करून, घनकचऱ्याची निर्मिती किमान होईल, याची दक्षता घ्यावी. त्यामुळे नवीन वस्तुंची मागणी कमी होईल व पर्यायाने कचरा कमी होईल. याअनुषंगाने पुढील बाबी अंमलात आणाव्यात :-

- जुन्या बरण्या, बाटल्या व सामग्री ठेवण्याच्या इतर भांडयांचा पुर्नवापर करणे.
- उपयोगात न येणा-या वस्तुंची विक्री करणे, अथवा गरजूंना देणे.
- जुन्या वृत्तपत्रांचा वापर, पिशव्या बनवण्यासाठी करावा.
- शक्यतो, रिचार्ज होणाऱ्या बॅट्रीचा वापर करावा.

- घरातल्या टाकावू वस्तुंपासून नाविन्यपूर्ण वस्तू निर्मित कराव्यात ( उदा:-जुन्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा झाडे लावण्याच्या कुंड्याकरिता, फ्लॉवरप्लॉट म्हणून वापर, इ.)
- पुर्नवापर करण्यायोग्य वस्तु कच-यामध्ये न टाकता, अशासकीय संस्थांना (NGO- Non Governmental Organization, CSO-Central Statistical Organization ) गरज असल्यास, पुर्नवापरासाठी देणे.

**पुर्नचक्रिकरण ( Recycle)**

कोणत्याही निरूपयोगी वस्तूचे भौतिक अथवा रासायनिक पद्धतीने विघटन करून, त्यावर प्रक्रिया करणे व नवीन वस्तुची निर्मिती करणे म्हणजे पुर्नचक्रिकरण (Recycling). पुर्नचक्रिकरण अप-सायकलिंग आणि डाऊन-सायकलिंग या दोन प्रकाराने करता येते. अप-सायकलिंग म्हणजे, जुन्या वस्तूचे त्याच्या पूर्वीच्या मुल्यापेक्षा अधिक मूल्याची वस्तू निर्माण करणे. डाऊन-सायकलिंग म्हणजे, जुन्या वस्तूचे त्याच्या पूर्वीच्या मुल्यापेक्षा कमी मूल्याची वस्तू निर्माण करणे.

पुर्नचक्रिकरणासाठी विचारात घ्यावयाचे मुद्दे: -

- विघटनशील (Degradable) कचऱ्यापासून शेणखत निर्मिती.
- विघटनशील कचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती.
- प्लास्टिक/काच/धातू सारख्या अविघटनशील (Non-degradable) कचऱ्याचे पुर्नचक्रिकरण करण्यासाठी तो कचरा कचरावेचक/ कचरा-व्यवसायिकांना विक्री करणे.
- प्लास्टिक कचऱ्याच्या योग्य संकलन/साठवण व्यवस्थेसाठी ग्रामस्तरावर प्लास्टिक क्रशर, कॉम्पॅक्टर इत्यादींची व्यवस्था PRO मार्फत करणे. तद्नंतर PRO मार्फत यांचे पुर्नचक्रिकरण होणे.

**पुर्नप्राप्ती (Recovery)**

पुर्नप्राप्ती म्हणजे निरूपयोगी कच-यापासून उर्जा निर्मिती करणे. जसे विघटनशील (Degradable) कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती व निरूपयोगी प्लास्टिक पासून इंधन निर्मिती करणे होय. याकरिता जमा केलेला निरूपयोगी प्लास्टिक कचरा PRO कडे शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे देणे आवश्यक आहे.

**विवरणपत्र इ**

**केंद्र शासनाचे पत्र क्रमांक S-१५०१४/१/२०१८-SBM- III-Part(I), दिनांक ०८ मार्च, २०१९ नुसार निर्गमित केलेल्या गोबरधनच्या सुधारित मार्गदर्शक सूचना.**

**विवरणपत्र ई**

**प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये प्लास्टिक कच-याच्या विल्हेवाटीसंदर्भात, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली ठळक वैशिष्ट्ये.**

शासन निर्णय क्रमांक :- स्वभामि-२०१९/प्र. क्र. १४१/पापु-१६, दिनांक १९ जुलै, २०१९ सोबतचे विवरणपत्र-इ.

केंद्र शासनाचे पत्र क्रमांक S-१५०१४/१/२०१८-SBM-III-PART (I), दिनांक ०८ मार्च, २०१९ नुसार निर्गमित केलेल्या गोबरधनच्या सुधारित मार्गदर्शक सूचना.

S-15014/1/2018-SBM-III-Part(1)
Government of India
Ministry of Drinking Water & Sanitation
***

4th Floor, Pt. Deendayal Antyodaya Bhawan,
CGO Complex, Lodhi Road
New Delhi-110003
**Date: 08th March, 2019**

To,
Additional Chief Secretary/ Principal Secretary
In charge of Rural Sanitation
All States/UTs

**Subject: Revision in operational guidelines of GOBAR-Dhan scheme- reg.**

Madam/Sir,

As you are aware, GOBAR-Dhan scheme (Galvanising Organic Bio-Agro Resources Dhan) was announced in Feb, 2018. The objective of the scheme is to support biodegradable waste recovery and conversion of waste into resources, thus creating clean village and also providing economic and resource benefit to villagers. However we are receiving various requests from the States for making certain changes in the guidelines so that the scheme could be implemented effectively.

2. Based on the feedbacks received from the states and the deliberations in the SLWM workshops held on 07-08th September, 2018 in Gangtok(Sikkim) and subsequently on 30-31st January, 2019 in New Delhi, following changes are being made in the guidelines:-

| Heading | Existing sentence | Revised |
|---|---|---|
| **Role of State** | DWSC shall be the nodal agency for project approval and monitoring at the district. Upon receiving of application from interested entities, the committee, headed by the District Collector/District Magistrate, shall evaluate the proposal and upon satisfactory evidence and viability, shall forward to the STAC. STAC shall evaluate the proposal, especially the technical soundness and share final approval and communicate through State Government. | The approval of viable projects by the State Level Technical Advisory Committee (STAC) is not mandatory. The DWSC, headed by the district Collector/District Magistrate, shall be responsible for the final approval of projects, implementation and monitoring. The district is responsible for approving projects that are technically sound and practical to implement.<br><br>Districts can reach out to technical agencies, experts from the existing STAC and relevant government departments, for necessary support.<br><br>The STAC shall continue supporting districts in selecting technical agencies. The STAC will issue EoI's for empanelment of technical agencies which |

| | | |
|---|---|---|
| | | will support the selected application and for empaneling technologies. |
| **Model B: Gram Panchayat, supported by technical agency is Entity** | Gram Panchayats should have adequate bio-mass such as animal dung, farm residue, etc. in order to take up the project.<br><br>Gram Panchayat must consider a community size plant model where significant number of households and villages are benefitted from reduced waste in the environment. | Exemption may be given to North-Eastern and Hill States to allow them to construct habitation level biogas plants under the scheme, as opposed to only larger community level plants. |
| **Approval Process** | State shall issue an Expression of Interest inviting applications from eligible applicants - Gram Panchayats, SHG/Federations, Bulk Waste Generators and Entrepreneurs. | While the State may continue issuing EoI's inviting applications from eligible applicants, Districts can collect project proposals from interested GPs/SHGs as well, by defining the eligibility criteria as given in GOBAR-DHAN Guidelines. |
| **Recommended Models of Operation** | Model A: Gram Panchayat<br>100% plant cost or as per SBMG SLWM slab as indicated below, whichever is less. Plant serving GPs with total funds available:<br>150 HHs–3.5 lakh<br>300 HHs–6 lakh<br>500 HHs–7.5 lakh<br>>500 HHs–10 lakh | 100% plant cost or as per SBMG SLWM slab as indicated below, whichever is less. Plant serving GPs with total funds available:<br>150 HHs– 7 lakh<br>300 HHs– 12 lakh<br>500 HHs– 15 lakh<br>>500 HHs–20 lakh<br><br>States can avail the funds within the prescribed slab at their discretion, for all planned SLWM initiatives including GOBARDHAN. |
| **Recommended Models of Operation** | Model B: SHG Federation<br>75% plant cost or as per SBMG SLWM slab as indicated below, whichever is less. Plant serving GPs with total funds available:<br>150 HHs–3.5 lakh<br>300 HHs–6 lakh<br>500 HHs–7.5 lakh<br>>500 HHs–10 lakh | 75% plant cost or as per SBMG SLWM slab as indicated below, whichever is less. Plant serving GPs with total funds available:<br>150 HHs– 7 lakh<br>300 HHs– 12 lakh<br>500 HHs– 15 lakh<br>>500 HHs–20 lakh |
| **Recommended Models of Operation** | Model C: Bulk Waste Generator/ Entrepreneur<br>50% plant cost or as per SBMG SLWM slab, whichever is less. Plant serving GPs with totalfunds available:<br>150 HHs–2.8 lakh<br>300 HHs–4.8 lakh<br>500 HHs–6 lakh<br>>500 HHs–8 lakh | 50% plant cost or as per SBMG SLWM slab, whichever is less. Plant serving GPs with total funds available.<br>150 HHs– 7 lakh<br>300 HHs– 12 lakh<br>500 HHs– 15 lakh<br>>500 HHs–20 lakh |

| | | |
|---|---|---|
| **Recommended Models of Operation( Incentives)** | 20% of total incentive released can be used to pay technical agency as turnkey fee | 10% of total incentive released can be used to pay technical agency as turnkey fee |

Yours faithfully,

(signature) 5/3/2019

**(Samir Kumar)**
Joint Secretary to the Govt. of India

Copy to.

1. The Mission Director (SBM-G), All States/UTs

शासन निर्णय क्रमांक :- स्वभामि-
२०१९/प्र. क्र. १४१/पापु-१६,
दिनांक १९ जुलै, २०१९ सोबतचे
विवरणपत्र-ई.
प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम
२०१६ अन्वये प्लास्टिक
कच-याच्या विल्हेवाटीसंदर्भात,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण
मंडळाच्या संकेतस्थळांवर उपलब्ध
असलेली ठळक वैशिष्ट्ये .

## Salient features of the Plastic Waste Management Rules, 2016 and its likely implication

| Plastic Waste (Management and Handling) Rules, 2011 | Plastic Waste Management Rules, 2016 | Reasons / and likely implications |
|---|---|---|
| Title<br>Plastic Waste (Management and Handling) Rule,2011 | Plastic Waste Management Rules, 2016 | Handling included in the word 'Management' |
| Application: Only to the Municipal area | These rules shall apply to every waste generator, local body, Gram Panchayat, manufacturer, Importers and producer. | Importers are brought under the purview since importing is also a route of brining plastic carry bags/ multilayered packaging to the country<br><br>The jurisdiction has been extended to rural area also since plastic has reached to our rural areas also. |
| **Prohibition** | | |
| carry bag made of virgin or recycled plastic, shall not be less than **forty** microns in thickness; | carry bag made of virgin or recycled plastic, shall not be less than **fifty** microns in thickness; | An eco-friendly product which is a complete substitute of the plastic in all the uses has not been found till date. In the absence of a suitable alternate, it is impractical and undesirable to impose a blanket ban on the use of plastic all over the country. The real challenge is to improve plastic waste management systems.<br><br>The increasing thickness of plastic carry bags from 40 to 50 micron and stipulation 50 micron thickness for plastic |
| Natural shade or pigments as per IS Code. | No change | |
| Carry bags made of recycled plastics shall not be used for Packaging food stuff | No change | |
| sachets using plastic material shall not be used for storing, packing or selling | No change | |

1

| | | |
|---|---|---|
| gutkha, tobacco and pan masala<br><br>Nil | **plastic sheet** or like, which is not an integral part of multilayered packaging and cover made of plastic sheet used for packaging, wrapping the commodity shall not be less than fifty microns in thickness except where the thickness of such plastic sheets impair the functionality of the product; | sheets will likely to increase about 20 % cost hence, the tendency to provide free carry bags will come down and the collection by the waste pickers also increase to some extend. |
| **Responsibility of Waste Generators** | | |
| --Nil.. | Waste Generators including institutional generators, event organisers shall<br><br>not to litter the plastic waste<br><br>segregate waste and handover to authorized agency.<br><br>pay user fee as prescribed by ULB and spot fine in case of violation. | Earlier there were no specific responsbilities for the event organisers, institutional generators<br><br>Introducing responsibility for the waste generator, will improve the segregation and reuse/ recycle. Reduce littering.<br><br>This will improve plastic waste management |
| **Responsibility of Producer, Brand owner** | | |
| Nil | Producer, Brand Owner need to work out modalities for waste collection system for collecting back the plastic waste within a period of **six months** in consultation with local authority / State Urban Development Department and implement with **two years** thereafter.<br><br>This plan shall be submitted to the SPCB while applying for Consent to Establish or Operate or Renewal. | littering of PW is the major problem. The real challenge is to improve plastic waste management systems.<br><br>The introduction ofcollect back system of waste generated from various products by the Producers/ Brand owners of those |

| | | |
|---|---|---|
| | If CTE/CTO renewed before the notification of these rules, shall submit such plan within six months from the date of notification and implement with two years thereafter. | products would improve thecollection of plastic waste, its reuse/ recycle. |
| **Responsibility of local body and Gram Panchayat** | | |
| The local body shall be responsible for plastic waste management system and for performing the associated functions.<br><br>may seek financial assistance from producers to set up the Waste Management System<br><br>encourage use of PW for Road Construction, Energy Recovery etc.<br><br>No carry bags shall be made available free of cost by retailers to consumers. The Municipal authority may by notification determine minimum price of carry bags. | No Change<br><br>Mandatory<br><br>promote use of plastic waste for road construction as per Indian Road Congress guidelines or energy recovery or waste to oil etc.<br><br>by notification or an order, introduce collection of plastic waste management fee through pre registration of the producers, importers of plastic carry bags / multilayered packaging and vendors selling the same. plastic waste management fee shall be of minimum rupees forty eight thousand @ rupees four thousand per month.<br><br>may prescribe higher plastic waste management fee, depending upon the production or sale capacity. | Gainful utilisation of plastic waste.<br><br>Municipal authorities have not fixed cost on carry bags and the rules are silent on the mode of payment of such money collected from pricing of carry bags by the retailers to Municipal authority.<br><br>The introduction of provision tocollect fee from the producers, importers of plastic carry bags / multilayered packaging and vendors selling the same, will strengthen financial status of local |

| | | |
|---|---|---|
| | | authorities and improve Plastic Waste Management System |
| **Responsibility of retailers and street vendors** | | |
| -----Nil--- | The shopkeepers and street vendors willing to provide plastic carry bags for dispensing any commodity shall register with local body on payment of **plastic waste management fee** of minimum rupees forty eight thousand @ rupees four thousand per month.<br><br>Only the registered shopkeepers or street vendors shall be eligible to provide plastic carry bags for dispensing the commodities<br><br>The registered shop keepers shall display at prominent place that plastic carry bags are given on payment<br><br>not to sell or provide commodities to consumer in carry bags or plastic sheet or multilayered packaging, which are not manufactured and labelled or marked, as prescribed under these rules.<br><br>defaulters liable to pay such fines as specified under the bye-laws of the local bodies. | The imposition of **plastic waste management fee**on retailers and street vendors will force them to collect cost on carry bags which in turn make the public to either switch over to other bags or reuse of carry bags, reduce the Plastic waste generation.<br><br>Will strengthen financial status of local authorities and improve Plastic Waste Management System. |
| **State Level Monitoring Committee** | | |
| Secretary UDD- Chairman<br><br>Representative from | Addition:<br>Municipal Commissioner,<br>Commissioner, Value Added Tax or his nominee, | Strengthened suitably |

| | | |
|---|---|---|
| Environment Dept,<br>PCB,<br>ULB,<br>NGO,<br>Industry and<br>academic Institution.<br><br>shall meet at least once in a year. | Sales Tax Commissioner or Officer, representative of Plastic Association,<br>Drug Manufacturers Association,<br>Chemical Manufacturers Association<br>Director, Municipal Administration- Convener<br><br>Once in Six Months | |
| **Responsibility of CPCB/SPCBs** | | |
| No person shall manufacture carry bags or recycle plastic bags or multilayered packaging without registration from SPCB/PCC. | No change | |
| ...Ni... | shall not renew registration of producer unless the producer possesses and **action plan** endorsed by the Secretary in charge of Urban Development for setting of plastic waste management system | To ensure that all manufacturer of carry bags or recycle plastic bags or multilayered packaging evolve and implement collect back system. |
| SPCB shall submit annual report on the use and management of plastic waste to the CPCB before the 30th September.<br><br>CPCB shall prepare a consolidated annual report on the use and management of plastic waste and forward it to the Central Government along with its recommendations before the 31st December of every year. | 31st July, 2016<br><br>31st August of every year. | To maintain uniformity in submission of Annual report in all waste management rules |

| Land for waste management facility | | |
|---|---|---|
| --Nil. | The Department dealing the land allotment in the State Government shall be responsible to provide land for establishing waste management facility. | Getting suitable land is the problem in many States for establishment of waste management facility. making the responsibility to provide land by the Department dealing the allotment of land would eliminate the issue of getting land for the waste management facility. |

******

**राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या १५० व्या जयंती निमित्त स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत कार्यक्रम राबविण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
### शासन शुध्दीपत्रक क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र.क्र.५४९/पापु-१६.

७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक: २२ जुलै, २०१९.

**वाचा :** पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/ प्र.क्र.५४९/पापु-१६, दिनांक ११/०७/२०१९.

**शासन शुध्दीपत्रक:**

उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयातील तक्ता “अ” ऐवजी पुढील प्रमाणे तक्ता “अ” वाचण्यात यावा:-

**तक्ता “अ”**

**दिनांक २ ऑक्टोबर २०२० पर्यंत पूर्ण करावयाची कामे**

| क्र | कार्यक्रमाचे स्वरुप | शासन आदेश/पत्र | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या सर्व कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालय बांधकाम करणे तसेच सर्वेक्षणातील व सर्वेक्षणातून सुटलेल्या सर्व लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान वितरीत करणे. | संदर्भाधीन क्रमांक ७ ते १४ | दिनांक ३१/०७/२०१९ पर्यंत |
| २ | एक खड्डा शौचालयाचे दोन खड्डा शौचालयामध्ये रुपांतर करणे. | संदर्भाधीन क्रमांक १ व ५ | दर दिवशी प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १५ |

| क्र | कार्यक्रमाचे स्वरुप | शासन आदेश/पत्र | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| ३ | सार्वजनिक/सामुहिक शौचालयांचे बांधकाम करणे. | संदर्भाधीन क्रमांक १५ व १६ | दर महिन्याला प्रत्येक जिल्हयात किमान १५ |
| ४ | मोठया कुटुंबांसाठी दोन शौचालये बांधणे- तालुक्यातील ज्या कुटुंबांमध्ये ८ पेक्षा जास्त व्यक्ती असतील अशा कुटुंबांना एक अतिरिक्त वैयक्तिक शौचालय बांधण्यास प्रवृत्त करणे. | | दर महिन्याला प्रत्येक तालुक्यामध्ये किमान ४० कुटुंबाना अतिरिक्त वैयक्तिक शौचालय बांधण्यास प्रवृत्त करणे |
| ५ | i)शाश्वत स्वच्छता आराखडयातून सोनखत तयार झालेली शौचालये व वापरकर्ते कुटुंब यांचा शोध घेणे. | | दिनांक ३१/०७/२०१९ पर्यंत |
| | ii) शौचालयाच्या खड्डयामधून सोनखत काढून खड्डा रिकामा करणे. | | दर तीन महिन्यांमध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १खड्डा रिकामी करणे अनिवार्य आहे. |
| ६ | घनकचऱ्याचे जागेवर विलगीकरण करणे व व्यवस्थापन करणे. | संदर्भाधीन क्रमांक २ ते ६ | दर महिन्याला प्रत्येक तालुक्यामध्ये किमान ८ गावांसाठी नियोजन करुन कार्यवाही करणे. |
| ७ | सांडपाण्याकरिता शोष खड्डे तयार करणे. | संदर्भाधीन क्रमांक २ ते ६ | दर दिवशी प्रत्येक तालुक्यामध्ये उपलब्ध शासकीय योजनांच्या कृती संगम, लोक सहभाग अथवा निगमित (कंपनी) सामाजिक बांधिलकी (CSR Fund) यामधून उपलब्ध निधीतून किमान १०कुटुंबांसाठी नियोजन करुन कार्यवाही करणे. |

| क्र | कार्यक्रमाचे स्वरुप | शासन आदेश/पत्र | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| ८ | गावातील सांडपाणी प्रक्रीया व पुर्नवापर. | | कार्यक्रम कालावधीत प्रत्येक तालुक्यामधील किमान २ गावे निश्चित करुन त्या गावांमध्ये सांडपाणी प्रक्रीया व पुर्नवापर यासाठी कार्यवाही करण्यात यावी. |
| ९ | सफाई कामगारांच्या आरोग्याची काळजी घेणे. | | दिनांक २ ते ९ ऑक्टोबर २०१९ या कालावधीतील कार्यक्रमा व्यतिरिक्त, जिल्हा आरोग्य केंद्राशी समन्वय साधून दर महिन्याला प्रत्येक तालुक्यातील किमान २० सफाई कामगारांसाठी मोफत आरोग्य चिकित्सा (तपासणी कार्यक्रम) आयोजित करणे |

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१२१७०८९०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2019.07.22 14:52:22 +05'30'

**(स्मिता. स. राणे)**
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.

३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.

४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

५. मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य.

६. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

७. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.

८. उपसचिव तथा प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई.

९. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष, सर्व.

१०.विभागीय आयुक्त, सर्व.

११.जिल्हाधिकारी, सर्व.

१२.महासंचालक ,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

१४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सर्व.

१५.उपायुक्त (विकास), सर्व.

१६.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती/उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१८.संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

१९.निवडनस्ती, पापु-१६.

महाराष्ट्रातील कोरोना विषाणू प्रसारातून झालेल्या कोविड-१९ च्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी, काम करणाऱ्या स्वच्छाग्रहींची कार्यपद्धती निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र.क्र. ६३५/पापु-१६
७ वा मजला, जी.टी.रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४००.००१.
तारीखः २०, एप्रिल २०२०.

वाचा -

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ,स्वभामि- २०१८/प्र. क्र. ६३५/पापु-१६,दिनांक, २० डिसेंबर २०१८.

२) पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर यांचे पत्र दिनांक, १० एप्रिल २०२०.

३) केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता विभागाचे पत्र , दिनांक ३१ मार्च २०२०.

प्रस्तावना :-

कोविड-१९ या संसर्ग रोगाचा प्रसार आणि त्याचा स्वच्छतेशी असणारा संबंध, याबाबी लक्षात घेवून विभागाने नुकतीच स्वच्छाग्रही नियुक्तीला ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. कोविड- १९ च्या कालावधीमध्ये, राज्यातील जिल्ह्यांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या स्वच्छाग्रहींची कामे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

कोविड- १९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत १) अहमदनगर २) बीड ३) बुलढाणा ४) धुळे ५) गोंदिया ६) हिंगोली ७) जळगाव ८) जालना ९) कोल्हापूर १०) नागपूर ११) नाशिक १२) उस्मानाबाद १३) पालघर १४) पुणे १५) रायगड १६) रत्नागिरी १७) सांगली १८) सातारा १९) सिंधुदुर्ग २०) ठाणे २१) वाशिम २२) यवतमाळ २३) औरंगाबाद २४) अमरावती २५) अकोला २६) लातूर २७) सोलापूर या जिल्ह्यांमध्ये, पुढीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.

ग्रामपंचायतीची निवडः-

ग्रामपंचायतीची निवड करताना आजाराचा प्रादुर्भाव झालेल्या ग्रामपंचायती बरोबरच त्यांच्या नजीकच्या ग्रामपंचायती, प्रादुर्भाव झालेल्या शहरी ठिकाणांच्या शेजारील ग्रामपंचायती, जिल्हाधिका-यांनी ठरविलेल्या ग्रामपंचायती अशा

ग्रामपंचायतींची निवड करावी. ग्रामपंचायत निवडीचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचा राहील.

स्वच्छाग्रही नियुक्ती:-

- शासन निर्णय, दिनांक २० डिसेंबर २०१८, अनुसरून करण्यात आलेल्या स्वच्छाग्रहींच्या नियुक्त्या ग्रामपंचायतींना सुरु ठेवता येतील.
- सध्याच्या आपत्कालीन स्थितीत २०० कुटुंबाप्रमाणे एक याप्रमाणे ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे सरपंच, आणि ग्रामसेवक, ग्रामपंचायत यांच्या संयुक्त स्वाक्षरीने, स्वच्छाग्रही संबंधी पात्रता आणि निकषाच्या अधीन राहून अधिकच्या स्वच्छाग्रहींची नियुक्ती करू शकतील. मान्यतेसाठी गटविकास अधिकारी, यांची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी. आगामी काळात होणाऱ्या ग्रामसभेत या नियुक्तीला मान्यता घेणे आवश्यक असेल.
- नियुक्ती संदर्भातील कागदपत्रे ग्रामपंचायत अभिलेख्यात समाविष्ट करावीत.
- जिल्हा स्वच्छता कक्षाने या नवनियुक्त स्वच्छाग्रहींची माहिती MIS वर तात्काळ अपलोड करावी.

स्वच्छाग्रही निवडीचे निकष:-

- अर्जदार व्यक्ती स्थानिक रहिवासी आणि गावात राहणारी असावी.
- अर्जदार व्यक्ती साक्षर, स्वयंप्रेरीत, कोविड-१९ प्रादुर्भावाच्या स्थितीत काम करण्यास तयार व सामाजिक कामाची आवड असणारी असावी.
- अर्जदार व्यक्ती सामाजिक स्तरावर संवाद साधण्यासाठी सक्षम, वेळ देवू शकणारी असावी.
- सद्यस्थितीत स्वयंप्रेरणेने स्वच्छता कामात सहभागी व्यक्ती आणि महिला यांना प्राधान्य द्यावे

स्वच्छाग्रहींची कामे :-

- संदर्भीय १ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट (४ ते ७) मध्ये दर्शविलेल्या कामांची सूची अधिक्रमित करून, त्यांनी करावयाच्या सुधारित कामांची सूची या शासन निर्णयामधील, तक्ता अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल.

स्वच्छाग्रहींची क्षमता बांधणी:-

- स्वच्छाग्रही त्यांची कामे सक्षमरीत्या करु शकतील, यासाठी संवाद कौशल्य, संवाद साहित्य वापर, समाज संघटन, सनियंत्रण, स्वच्छता विषयक तंत्रज्ञान, स्वच्छता साधनांची देखभाल आणि दुरुस्ती, माहिती संकलन, आपत्तीकाळात

करावयाची स्वच्छता विषयक कामे ई. विषयांवर दृक्श्राव्य व डिजिटल माध्यमातून, प्रशिक्षण आणि कार्यशाळांच्या माध्यमातून जिल्हा स्वच्छता कक्ष, स्वच्छाग्रहींसाठी अपेक्षित क्षमता बांधणी उपक्रमांचे आयोजन करेल. अशा उपक्रमात दिलेल्या सूचनेप्रमाणे सहभागी होणे स्वच्छाग्रहीसाठी बंधनकारक असेल.

**स्वच्छाग्रहींच्या कामाचे सनियंत्रण :-**

- स्थानिक ठिकाणी स्वच्छाग्रहींच्या कामाचे सनियंत्रण सरपंच आणि ग्रामसेवक, ग्रामपंचायत हे करतील. तालुका स्तरावरून तालुका स्वच्छता कक्ष व गटविकास अधिकारी आणि जिल्हा स्तरावरून जिल्हा स्वच्छता कक्ष स्वच्छाग्रहीच्या कामाचे सनियंत्रण करतील.
- तालुका स्वच्छता कक्ष प्रत्येक स्वच्छाग्रहीच्या कामाचे अहवाल संकलित करून त्याआधारे स्वच्छाग्रहींच्या कामाचा अहवाल तयार करून जिल्हा स्वच्छता कक्षाकडे सादर करेल.

**स्वच्छाग्रही कामाचे अहवाल :-**

- स्वच्छाग्रही आपल्या कामाचा संख्यात्मक आणि गुणात्मक मासिक अहवाल विहित प्रपत्रात दरमहा १० तारखेच्या आत ग्रामसेवकाच्या स्वाक्षरीसह तालुका स्वच्छता कक्षाकडे सादर करतील.
- ग्रामपंचायतीच्या प्रत्येक मासिक बैठकीत स्वच्छाग्रही आपल्या कामाचा संख्यात्मक आणि गुणात्मक मासिक अहवाल सादर करतील.
- तालुका स्वच्छता कक्षाने आयोजित केलेल्या विविध आढावा बैठकींमध्ये, स्वच्छाग्रही आपल्या कामाचा संख्यात्मक आणि गुणात्मक आढावा सादर करतील.

**स्वच्छाग्रही प्रोत्साहन भत्ता वाटप निकष आणि पद्धती:-**

- स्वच्छाग्रहींना प्रोत्साहन भत्ता प्राप्त करण्यासाठी, ग्रामसेवकांच्या स्वाक्षरीसह आपले मासिक अहवाल तालुका स्वच्छता कक्षाकडे सादर करावे लागतील.
- स्वच्छाग्रही मानधन वाटप तालुका कक्षाकडून मासिक पद्धतीने केले जाईल.
- स्वच्छाग्रहीचे मासिक मानधन, त्यांनी महिनाभरात केलेले काम आणि त्यासाठी निर्धारित केलेले मानधन या आधारे केवळ बँकेमार्फत दिले जाईल
- जर स्वच्छाग्रहीने सामाजिक दायित्वाच्या भावनेतून हे काम स्वीकारले असेल आणि त्याला मानधन घ्यावयाचे नसेल तर अशा स्वच्छाग्रहीकडून तसे लेखी पत्र घ्यावे. अशा स्वच्छाग्रहीना नियमित अहवाल सादर करावे लागतील, तथापि, त्यांना मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

- स्वच्छाग्रही प्रोत्साहन भत्ता, माहिती, शिक्षण आणि संवाद या लेखाशिर्षातून अदा करण्यात यावे.

**कोविड- १९ संसर्ग आणि तत्सम आपत्कालीन स्थितीत स्वच्छाग्रही प्रोत्साहन भत्ता वाटपः-**

- सध्या कोविड- १९ संसर्गस्थितीत स्वच्छाग्रहीनी महिनाभर शासन निर्णया सोबतच्या तक्ता अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, कामे केल्यास प्रती स्वच्छाग्रही जास्तीत जास्त प्रतिमाह रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) इतका प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात यावा. या काळात त्यांना नेमून दिलेली कामे करणे शक्य नसते तसेच आपत्कालीन स्थितीत कामाची वेगळी गरज असते, या पार्श्वभूमीवर, स्वच्छाग्रहींनी सध्या हाताची स्वच्छता, खोकणे आणि शिंकणे या वेळी घेण्याची काळजी, कुठेही थुंकण्याच्या सवयी, मास्कचा वापर, निर्जंतुकीकरण, शारीरिक अंतर या महत्वाच्या विषयावर ग्रामस्थांशी संवाद साधावा आणि योग्य ते मार्गदर्शन करावे. ही परिस्थिती सामान्य झाल्यावर पुढे दिलेल्या तपशिलानुसार कामांच्या प्रमाणात स्वच्छाग्रही प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात येईल.

तालुका आणि जिल्हा कक्षाची जबाबदारी:-

- स्वच्छाग्रही संदर्भात नियुक्ती, प्रोत्साहन भत्ता वाटप, कार्य मूल्यमापन आणि आढावा बैठका घेण्याचे प्राथमिक दायित्व तालुका स्वच्छता कक्षाचे असेल. गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, (पंचायत) यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कक्षातील नियुक्त समन्वयकांनी हे काम करावे.
- जिल्हा कक्षातील मनुष्यबळ विकास आणि क्षमता बांधणी सल्लागार हे, स्वच्छाग्रहींच्या संबंधी सर्व माहिती आणि त्यांची क्षमता बांधणी करण्यासाठी जबाबदार असतील.
- जिल्हा कक्षातील माहिती, शिक्षण आणि संवाद सल्लागार हे स्वच्छाग्रहींच्या माध्यमातून विविध संवाद उपक्रम, संवाद साहित्याचा प्रसार, उपलब्ध आणि उपयुक्त संवाद साहित्य उपलब्ध करून देणे, आणि वर्तन बदलासाठी आंतरव्यक्ती संवाद उपक्रम राबविले जावेत, यासाठी जबाबदार असतील. स्वच्छाग्रहींच्या संवाद कौशल्य विकासाची जबाबदारी हि, माहिती, शिक्षण आणि संवाद सल्लागार यांची असेल.

स्वच्छाग्रही नियुक्ती रद्द करण्याची पद्धती:-

- स्वच्छाग्रही संबंधी सध्याच्या शासन धोरणानुसार सर्व स्वच्छाग्रहींची नियुक्ती ३१ मार्च २०२१ रोजी संपुष्टात येईल.

- निर्धारित कालावधी पूर्वी स्वच्छाग्रहीची नियुक्ती रद्द करायची असल्यास, ग्रामपंचायतीचा त्यासंबंधी अहवाल आणि तालुका स्वच्छता कक्षाचा चौकशी अहवाल याआधारे स्वच्छाग्रहींची नियुक्ती रद्द करता येईल.

तक्ता अ

स्वच्छाग्रही मासिक प्रोत्साहन भत्ता वाटपासाठी निर्धारित कामे आणि त्यांच्या संदर्भात दिला जाणारा प्रोत्साहन भत्ता

| अ. क्र. | कामाचा तपशिल | अनुज्ञेय मासिक प्रोत्साहन भत्ता रक्कम |
|---|---|---|
| १. | कार्यक्षेत्रातील १२५ किंवा निम्म्या कुटुंबाना गृहभेटीद्वारे कोविड- १९ बाबत, शौचालयाचा नियमित वापर याबाबत जनजागृती करणे व शौचालय नसल्यास बांधकाम करण्यास प्रवृत्त करणे. | रूपये ३००.०० |
| २. | संस्था, सार्वजनिक आणि कुटुंब स्तरावर कोविड- १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी योग्य पद्धतीने हात धुण्याचे व खोकणे आणि शिंकणे या वेळी घेण्याची काळजी, कुठेही थुंकण्याच्या सवयी , मास्कचा वापर याबाबत प्रात्यक्षिक देणे (सवय वाढीस लागेपर्यंत). | रूपये ३००.०० |
| ३. | कार्यक्षेत्रातील पाणी स्त्रोतांचे नमुने तपासणीसाठी जलसुरक्षकाला मदत करणे. | रूपये १००.०० |
| ४. | गावातील औपचारिक, अनौपचारिक गटांसोबत कोविड- १९ चा प्रादुर्भाव स्वच्छता उपक्रमात सहभागासाठी बैठका (उदा. VWSC, बचत गट, युवक मंडळ, मंडळ इ. सोबत) | रूपये १५०.०० |
| ५. | कोणीही उघड्यावर शौचविधी साठी जात नाही व सर्व ग्रामस्थ नियमित शौचालयाचा वापर करत आहेत, याबाबत ग्रामसेवकाला दर आठवड्याला अहवाल सादर करणे. | रूपये १५०.०० |
| | एकूण | रूपये १०००.०० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(चं. कृ. मोरे)

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.राज्यमंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

४. विभागीय आयुक्त, सर्व.

५. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता).

६. उप सचिव तथा प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक,
मंत्रालय, मुंबई.

७. उपायुक्त, विकास/आस्थापना, सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.

८. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती सर्व.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.

१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

११. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.

१२ संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (WSSO), बेलापूर, नवी मुंबई.

१३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.

१४.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.

१५.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.

१६. नियोजन विभाग, (का.क्र.१४४३), मंत्रालय, मुंबई.

१७ वित्त विभाग, (व्यय-3), मंत्रालय, मुंबई.

१८. कार्यासन क्र.पापु-०४, पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९. निवड नस्ती, कार्यासन पापु-१६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,(WSSO)

पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था


पत्र क्र.पा.व स्व.स.सं./०४१९/प्र.क्र.- २० / २०२० दिनांक:-१०/०४/२०२०

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद सर्व

**विषय :** गावस्तरावर स्वच्छाग्रही ची कोविड - १९ आ. राच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी मदत घेणे बाबत...

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्रमांक : स्वभामि - २०१८/प्र.क्र. ६३५/पापु - १६ दिनांक: २० डिसेंबर २०१८

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय दिनांक: ९ जानेवारी २०२०

महोदय,

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत उपरोक्त संदर्भ क्र. १) अन्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छाग्रही निवडलेले आहेत आणि त्यांची केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील माहिती प्रणालीत नोंद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे संदर्भ क्र. २ अन्वये या सर्व स्वच्छाग्रहींच्या निवडीला दिनांक: ३१ मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सद्यस्थितीत कोविड - १९ या आजाराचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावस्तरावर ग्रामपंचायतीच्या सर्व उपक्रमामध्ये सहकार्य घेण्याच्या उद्देशाने आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) च्या उपक्रमामध्ये मदत घेण्याच्या उद्देशाने मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या निर्देशाप्रमाणे दिनांक: २० डिसेंबर २०१८ च्या मूळ शासन निर्णयाची मुदत वाढवून दिनांक: ३१ मार्च २०२१ पर्यंत किंवा शासनाचे पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे.

या परिस्थितीत ग्रामस्थांना अत्यावश्यक असणाऱ्या वैयक्तिक स्वच्छतेच्या (वारंवार हात धुण्याच्या सवयीचा अंगीकार) सवयीबद्दल जागृती करणे, शौचालयाचा नियमित वापर करण्याचे महत्त्व सांगणे, सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेबद्दल जागृती करणे ई. अत्यावश्यक बाबींबद्दल स्वच्छाग्रही यांनी सद्यस्थितीत कार्य करणे अपेक्षित आहे.

आपला विश्वासू

(राहुल साकोरे)

संचालक

पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था

प्रत माहितीस्तव:

१) मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई

२) मा. सहसचिव व प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग , मंत्रालय

महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जागतिक बँक मार्फत प्राप्त प्रोत्साहन अनुदानातून कोविड-१९ या आजाराच्या प्रतिबंधासाठी जिल्हा परिषदांना निधी खर्चास परवानगी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

शासन निर्णय क्रमांक: स्वभामि-२०१९/प्र. क्र.१९४/पापु-१६

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१

तारीख: २० एप्रिल २०२०

वाचा: - १. केंद्रीय सचिव जलशक्ती मंत्रालय आणि पंचायत राज मंत्रालय,नवी दिल्ली यांचे संयुक्त अ.शा. पत्र क्रमांक S-११०११/१/२०२०-SBM-DDWS, दिनांक ८-४-२०२०

२. अतिरिक्त सचिव, पेयजल व स्वच्छता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक S-१८०११/२४/२०१५/SBM, दिनांक १३-४-२०२०

३. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र करोना-२०२०/प्र क्र ५८/आरोग्य ५, दिनांक १६-४-२०२०

प्रस्तावना:

सद्यस्थितीत सर्वत्र प्रादुर्भाव झालेल्या कोविड-१९ या आजाराच्या प्रतिबंधासाठी राज्याच्या ग्रामीण भागातील स्वच्छता कर्मचा-यांमार्फत ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छतेची कामे सुरू आहेत. या स्वच्छाग्रहींच्या सुरक्षिततेसाठी वाचा येथील पत्र क्रमांक १ व २ नुसार, पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता विषयक काम करणा-या स्वच्छाग्रहींना स्वच्छता साधनांची उपलब्धता होण्यासाठी, कोविड -१९ या आजाराचा प्रादुर्भाव झालेल्या परिशिष्ट "अ" मधील जिल्ह्यांना प्रति जिल्हा रक्कम रु १० लक्ष याप्रमाणे, एकूण रक्कम रु २७०.०० लक्ष निधी, यापूर्वी देण्यात आलेल्या "जागतिक बँक प्रोत्साहन अनुदान" अंतर्गत उपरोक्त बाबींसाठी खर्च करण्याची परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यात सद्यस्थितीत स्वच्छतेच्या कामासाठी स्वच्छाग्रही उत्कृष्टपणे आपली सेवा बजावत आहेत. सदर स्वच्छाग्रहींची नोंद स्वच्छ भारत मिशन ( ग्रामीण ) च्या SBM-MIS वर करण्यात आली आहे. ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छाग्रहींची सुरक्षितता, त्यांचे आरोग्य जपले जाणे महत्त्वाचे आहे. केंद्र

शासनाच्या वाचा येथील दिनांक ८/४/२०२० व दिनांक १३/४/२०२० च्या पत्रांनुसार ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता विषयक काम करणा-या कर्मचा-यांना स्वच्छता साधनांची उपलब्धता होणे तसेच प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये स्वच्छतेविषयक कामे अधिक प्रभावीपणे होणे आवश्यक आहेत. त्यासाठी जिल्ह्यांना खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. ग्रामपंचायत स्तरावर सदर आजाराच्या प्रतिबंधासाठी काम करणा-या स्वच्छाग्रहींना जागतिक बँक प्रोत्साहन अनुदान अंतर्गत सॅनिटायजर, हँड ग्लोझ तसेच मास्क आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्याची परवानगी देण्यात येत आहे. सदर बाबींची खरेदी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी ठरविलेल्या विनिर्देशांनुसार (स्पेसिफिकेशन) व वाचा क्र ३ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या नियमावलीनुसार करावी.

२. ग्रामपंचायतींची निवड करताना आजाराचा प्रादुर्भाव झालेल्या ग्रामपंचायती बरोबरच त्यांच्या नजिकच्या ग्रामपंचायती, प्रादुर्भाव झालेल्या शहरी ठिकाणांच्या शेजारील ग्रामपंचायती, जिल्हाधिका-यांनी ठरविलेल्या ग्रामपंचायती अशा ग्रामपंचायतींची निवड करावी. ग्रामपंचायत निवडीचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचा राहील. या ठराविक गावामध्येच या शासन निर्णयाप्रमाणे खर्च करण्यात यावा.

३. निवड केलेल्या ग्रामपंचायतींना निधी वितरित करताना ग्रामपंचायतीची मागणी, संबधित ग्रामपंचायतीमधील रोगप्रसाराचे प्रमाण, स्वच्छाग्रहींची संख्या, ग्रामपंचायत स्तरावर अन्य योजना अंतर्गत उपलब्ध असलेला निधी, या सर्व बाबी विचारात घेऊन, ग्रामपंचायतींची प्राथमिकता ठरविण्यात यावी आणि त्यानुसार संबधित ग्रामपंचायतींना निधी देण्यात यावा. कोणत्या ग्रामपंचायतीला किती निधी द्यावा, याबाबतचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घ्यावा.

४. वरील बाबीसाठी यापूर्वी "जागतिक बँक प्रोत्साहन अनुदान" निधी अंतर्गत जिल्हा परिषदांना वितरित केलेल्या प्रोत्साहन अनुदानातून ग्रामपंचायतींना निधी वितरित करण्यात यावा.

५. जिल्हा परिषदांकडे सद्यस्थितीत जागतिक बँक प्रोत्साहन अनुदान अंतर्गत उपलब्ध असलेल्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती अथवा सर्वसाधारण घटका अंतर्गत सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मधील विहित मर्यादेत निधी खर्च करण्यात यावा.

६. झालेल्या खर्चाची नोंद, SBM-MIS वर जागतिक बँक अंतर्गत कोणत्या घटकाखाली करण्यात यावी याबाबत यथावकाश कळविण्यात येईल.

७. उपरोक्तनुसार केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर तपशिल, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेस सादर करण्यात यावा.

८. परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या जिल्ह्यांना जागतिक बँक प्रोत्साहन अनुदान अंतर्गत प्रती जिल्हा रक्कम रु १० लक्ष या प्रमाणे रक्कम रु २७०.०० लक्ष खर्च करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

९. शासन निर्णयात नमूद केलेल्या जिल्ह्यांव्यतिरिक्त अन्य जिल्ह्यात कोविड -१९ या आजाराचा प्रादुर्भाव झाल्यास, सदर शासन निर्णय अशा जिल्ह्यांनाही लागू राहील. तथापि संबधित

जिल्ह्यांना सदर निधी खर्च करण्यापूर्वी शासनाची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक राहील. मान्यता मिळाल्यानंतर अशा जिल्ह्यांनाही रक्कम रु १०लक्ष पर्यंत खर्च करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( चं. कृ. मोरे)

अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत

१. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे स्वीय सहाय्यक , मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त, सर्व
५. सहसचिव, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे स्वीय सहाय्यक , मंत्रालय, मुंबई
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता).
९. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती सर्व.
१०. उपायुक्त, विकास/आस्थापना, सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
११. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.
१२. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (WSSO), बेलापूर, नवी मुंबई.
१३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१६. नियोजन विभाग, (का.क्र.१४४३), मंत्रालय, मुंबई.
१७. वित्त विभाग, (व्यय-३), मंत्रालय, मुंबई.
१८. कार्यासन क्र.पापु-०४, पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवड नस्ती, कार्यासन पापु-१६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

परिशिष्ट "अ"

| “जागतिक बँक प्रोत्साहन अनुदान” अंतर्गत खर्च करावयाचा निधी | | |
|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | खर्च करावयाचा निधी (लक्ष मध्ये) |
| १ | अहमदनगर | १०.०० |
| २ | बीड | १०.०० |
| ३ | बुलढाणा | १०.०० |
| ४ | धुळे | १०.०० |
| ५ | गोंदिया | १०.०० |
| ६ | हिंगोली | १०.०० |
| ७ | जळगाव | १०.०० |
| ८ | जालना | १०.०० |
| ९ | कोल्हापूर | १०.०० |
| १० | नागपुर | १०.०० |
| ११ | नाशिक | १०.०० |
| १२ | उस्मानाबाद | १०.०० |
| १३ | पालघर | १०.०० |
| १४ | पुणे | १०.०० |
| १५ | रायगड | १०.०० |
| १६ | रत्नागिरी | १०.०० |
| १७ | सांगली | १०.०० |
| १८ | सातारा | १०.०० |
| १९ | सिंधुदुर्ग | १०.०० |
| २० | ठाणे | १०.०० |
| २१ | वाशिम | १०.०० |
| २२ | यवतमाळ | १०.०० |
| २३ | औरंगाबाद | १०.०० |
| २४ | अमरावती | १०.०० |
| २५ | अकोला | १०.०० |
| २६ | लातूर | १०.०० |
| २७ | सोलापूर | १०.०० |
| | एकूण | २७०.०० |

(चं. कृ. मोरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन